**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**

==========================================================================

**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**

---

**Vol 11.Issue 3; March 2024**

==========================================================================

# वीरशैव संत कवी लक्ष्मण महाराज : एक चिंतन

**डॉ. पृथ्वीराजतौर**

मराठी विभाग प्रमुख

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पंचक्रोशी हो माझारी
जांब नामक आहे पुरी
ग्रामनाम जांब झाले
उत्तम लोक तेथे राहिले
तेथे मारुती अवतार
झाला हो तो विश्वंभर
परोपकारी ब्रह्मचारी
किती वर्णावी हो थोरी
भक्ती ज्ञान ते वैराग्य
प्रभुचे अक्षयी ते भाग्य
तेथे श्रीरामच्या मूर्ती
वसती आनंद भक्ताप्रति
प्रभोपासी आनंद थोर
सदा होतो जयजयकार
तेथे शिवलिंगेही वसती
भक्त प्रेमे हो पूजिती
लक्ष्मण म्हणे भक्ती
करा होय प्रभूप्राप्ती

सतराव्या शतकात होऊन गेलेल्या समर्थ रामदास स्वामींचे आणि त्यांच्या जांब या जन्मगावाचे एकोणिसाव्या शतकातील वीरशैव संत कवी लक्ष्मण महाराज यांनी केलेले हे वर्णन. केवळ जांब या गावाचेच नव्हे तर गोदावरी नदीच्या दक्षिण आणि उत्तर तटावरील तसेच पंचक्रोशीतील प्रत्येक गावाविषयी तेथील देवता विषयी तेथे होऊन गेलेल्या लोकोत्तर पुरुषाविषयी त्या त्या गावासंबंधी प्रचलित असलेल्या अख्यायिका दंतकथा याविषयीचे वर्णन निवेदन संत लक्ष्मण महाराज यांनी आपल्या अभंगांतून केले आहे.

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी लक्ष्मण महाराज गोदावरी पंचक्रोशीतील प्रत्येक गावात गेले आणि आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी 'प्रेमे भक्तीपंथ धरा' असा संदेश दिला.

सुखी संसारी वर्तावे
परी असावा स्मर
मूळ धरुनी चालावे
नाम घ्यावे सर्वदा
न लगे अरण्याचा वास
न लगे खटाटोप हो
सर्व पुराने सांगती
नाम श्रेष्ठ सर्वाते
कलयुगी नामाविन
नाही साधन दुजे
लक्ष्मण म्हणे सूर
नाम गाती सर्वदा

असा साधा सोपा नामस्मरणाचा मार्ग वीरशैव संत लक्ष्मण महाराज यांनी शिवभक्तांना दिला. एकीकडे त्यांनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने वीरशैव धर्माचा प्रसार केला. वीरशैव धर्मतत्त्वज्ञानाची शिकवण दिली. तर दुसरीकडे व्यापक मानवतावादी हीत लक्षात घेऊन लोकशिक्षकाचीही भूमिका स्वीकारली.

जागा जागा जागे व्हा
जागा आणि गस्त
फार हुशार रहा
फार होईल घात
पहा षडरिपू अति
हे अति चोर
पहा गावात राहती
दंगा करती फार
यांनी लूटली फार
महा महा थोर थोर

अशी गस्त त्यांनी याच लोकशिक्षकांच्या भूमिकेतून घातली. लक्ष्मण महाराज यांचे तिसरे ही एक महत्त्वाचे योगदान आहे, त्यांनी विपुल आणि विविध पूर्ण वाङ्मयनिर्मिती करून शांतीलिंग मन्मथस्वामींनी पायाभरणी केलेल्या वीरशैव वाङ्मय मंदिराचा कळस उभारला.

थोडक्यात वारकरी संप्रदायातील संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम या तिघांच्याही भूमिका कमी अधिक प्रमाणात वीरशैव संत लक्ष्मण महाराज यांनी एकाच वेळी केल्या आणि निजामी राजवटीत असणाऱ्या गोदावरी काठावर समन्वयाची साखरपेरणी केली.

जालना जिल्ह्यातील आष्टी धोतर जोडा येथे सोमवार अश्विन शुद्ध दशमी १८०० शके १७३०, इस १८०८ मध्ये लक्ष्मण महाराज यांचा जन्म झाला भाद्रपद वद्य दशमी १८००, इस १८७८ रोजी आष्टी येथेच त्यांनी नंदनी नदीच्या पूर्व किनाऱ्यावर समाधि घेतली. अर्थाने संत लक्ष्मण महाराज यांना 70 वर्षे तीन महिन्यांचे आयुष्य लाभले त्यांच्या या आयुष्याला अलौकिकतत्वाचा परिसर लाभला आहे माता बजाबाई आणि पिता कृष्णा रवळगावकरांचे लक्ष्मण हे पहिले चिरंजीव लग्नानंतर अनेक वर्षांनी रवळगावकर दांपत्याला लक्ष्मणाच्या रूपाने अपत्य लाभ झाला होता यासंदर्भातील हाकिकत लोकविलक्षण आहे.

अंदाजे वयाच्या २९ व्या वर्षी लक्ष्मण महाराज यांनी गृहत्याग केला व साखरखेर्डा गाठले. प्रसिद्ध स्वामींच्या मठामध्ये त्यांनी अध्ययनामध्ये मोठा काळ व्यतित केला. येथेच त्यांना लेखनसिद्धी प्राप्त झाली. परमार्थ मार्गाचे विवेचन करता आले. लक्ष्मण महाराज यांनी अभंग, ओवी, पदे, वासुदेव, भूपाळी, अष्टक, आरती, आर्या, गवळणी, स्तोत्र इत्यादी रचनाबंधामध्ये विपुल निर्मिती केली. त्यांचे मंगलाचरणाचे २६ अभंग उपलब्ध आहेत. ४६४ गंगा मधून त्यांनी शिव महात्मे वर्णिले आहे. ३६२अभंग गंगा महात्म्य कथन करतात. याशिवाय आत्मनिवेदन करणारेही अभंग मूळ संख्येने उपलब्ध आहेत.

मराठी समवेतच हिंदुस्थानी भाषेतही लक्ष्मण महाराज यांनी पद रचना केली आहे. निजामी राजवटीतील मराठवाड्यात वास्तव्य करत असण्याचाही हा एक परिणाम असण्याची शक्यता आहे, शिवाय अगोदरच्या परंपरेप्रमाणे लोकसंस्कृतीतील कथनबंध घेऊन लक्ष्मण महाराज यांनीही आपले धर्म तत्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

श्री सिद्धेश्वर महात्म्य, सिद्धस्तोत्र गुरुस्तोत्र, शिवस्तोत्र, परमेश्वर स्तोत्र इत्यादी एक हजाराहून जास्त स्तोत्रांमधून त्यांनी शिवाची महती सांगितली आहे.

कोणी एका स्त्रीचा पती
गेला देशाग्रामाप्रती
आणीले स्त्रीते अलंकार
मोती नाकीचे सुंदर
मोती नाकीते घातले
फार हर्षे स्त्री ती डोले
लोका दाखवी ती बाई
माझ्या पती ऐसा पती नाही
फार उपकार मानला
तेथे होती प्राज्ञ अबला
म्हणे मोती तुज दिले

त्याचे उपकार झाले
जाने नाक दिले बाई
स्मर त्याचा का गे नाही
लक्ष्मण म्हणे बारे
जगात ऐसेची झाले रे

अशा सहज साध्या दृष्टांत कथांमधून लक्ष्मण महाराज यांनी आपला संदेश सामान्यांपर्यंत पोहोचवला व त्यांना इशभक्तीचा मार्ग दाखवला.

शिवपुराण, स्कंदपुराण, बसवपुराण, शिवरहस्य आदी ग्रंथांमधील शिवभक्तांच्या कथांना लक्ष्मण महाराज यांनी अभंगरूप दिले. बीजे महादेवी, रुद्र पशुपती, शिवभक्त धनगरपुत्र, राजा चन्यु, राजा चित्रकेतू, गुणनिधी, राजा महाशैव, राजा वीरदास यांच्या मुळातच वाचनीय असलेल्या कथांचा गोडवा अभंगांमध्ये द्विगुणीत झाला आहे.

निजाम कालीन समाजातील वृत्ती प्रवृत्ती आणि मानवी जीवनाचे नानाविध रंग अगदी सहजपणे लक्ष्मण महाराजांनी अभंग रूप केलेल्या या कथांमध्ये विलसत असताना दिसतात. किर्तन आला सहाय्यभूत म्हणून या कथनात्मक अभंगांची निर्मिती झाली. आपली प्रतिपादन अधिक स्पष्ट करण्यासाठी शिवभक्तांच्या या कथा त्यांनी सांगितल्या. तत्कालीन वीर सर्वांना अधिक धर्मप्रवण करण्याच्या दृष्टीने या कथांचे निश्चितच सहाय्य झाले असणार. केवळ कथनात्मक अभंगांनीच नाही तर त्यांच्या बहुसंख्य वाङ्मयाची निर्मितीही कीर्तनाच्या निमित्ताने झाली आहे. त्यामुळे सहजता हा या वाङ्मयाचा प्रमुख गुणविशेष आहे.

लेखनामुळे येणारी क्लिष्टता लक्ष्मण महाराज यांच्या अभंगात आढळत नाही. उगवत्या रसाळ वाणीचे प्रवाहीपण अभंगात उतरले आहे. म्हणूनच उत्कट भाव काव्याची उंची या अभंगांना आपाप्ता प्राप्त झाल्याचे दिसते. सुमन महाराज यांच्या अभंगातील रूपके, प्रतिमा आणि अष्टके, आर्या आणि निर्यमक अभंग हे स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहेत. लोक वाङ्मयातील लोकसंस्कृतीतील विविध वैशिष्ट्यांचे लक्ष्मण महाराज यांनी आपल्या अभंगातून घडवलेले दर्शन विलोभनीय आहे.

लक्ष्मण महाराजांनी शिव भजन आणि कीर्तनाच्या निमित्ताने गोदावरी नदीच्या काठा काठावर भ्रमंती केली. गोदावरी काठावरील पंचक्रोशीतील ग्रामस्थांना शिवभक्तांच्या कथा सांगितल्या. लक्ष्मण महाराजांनी तीर्थयात्राही केल्याचे त्यांच्या चरित्रातून दिसते. यानिमित्ताने त्यांनी त्र्यंबकेश्वरपासून सागरतीर्थपर्यंतचा प्रदेश पायाखाली घातला. गोदावरी नदीच्या उगमापासून, सागराशी तिची भेट होईपर्यंतच्या तिच्या प्रवासात, साक्षी असलेल्या प्रत्येक गावात लक्ष्मण महाराज गेले. या गावांची महती त्यांनी आपल्या अभंगातून मांडली. आणि यातूनच 'गंगामहात्म्या'चा जन्म झाला.

तुला महात्म्य श्री लक्ष्मण महाराजांची रचना ऐतिहासिक सांस्कृतिक दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. दोनशे वर्षांपूर्वी गोदावरी नदीच्या काठावर असणारी गावे, तेथील मंदिरे, येथील सिद्धपुरुषांच्या समाध्या, गावासंबंधीच्या पौराणिक अख्यायिका यांची माहिती या अभंगातून मिळते.

गोदावरी नदीच्या दक्षिणतटी पंचक्रोशीतील काठवाडपासून सोनपेठ पर्यंतचे उल्लेख लक्ष्मण महाराज यांनी केले आहेत तर उत्तर तटी पंचक्रोशीतील विहामांडवा पासून जायकाच्या वाढीपर्यंतच्या गावातील माहिती

त्यांनी दिली आहे. संत एकनाथ रामदास स्वामी खादर बादशहा अवलिया यांचे सहज येणारे उल्लेख मोठे सुचक आहेत.

धन्य धन्य प्रभू शिव
धन्य धन्य दत्तात्रय देव
दोघां नाही वेगळीक
ऐक्यपणे दोघे एक
अक्षय समाधी खंडेना
वृत्तीकदा पालटेना
करावया जगदोद्धार
प्रभुने घेतला अवतार
विज्ञानेश्वर पूजिती
त्याला होय प्रभू प्राप्ती
लक्ष्मण म्हणे भक्ती
अतिप्रिय प्रभू प्रति

या अभंगातील विज्ञानेश्वरांचा उल्लेख संशोधकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

जालना जिल्हयातील गोदावरी काठच्या आणि गोदावरीच्या उत्तर साठी पंचक्रोशीतील गावासंबंधी दोनशे वर्षांपूर्वीच्या नोंदी गंगा महात्मा आढळतात या गावांचा इतिहास अभ्यासण्याच्या दृष्टीने या नोंदी सहाय्यभूत ठरू शकतात.

संदर्भ ग्रंथ

श्री लक्ष्मण गाथा - संपादक डॉ. शे दे पसारकर
लक्ष्मण महाराज: व्यक्ती आणि वाङ्मय -डॉ. भि. शि. स्वामी
श्री संत लक्ष्मणाची अभंग वाणी - प्रा शे. दे. पसारकर
लक्ष्मण महाराज विरचित शिवकथा - संपादक भि. शि. स्वामी
महाराष्ट्र सारस्वत खंड एक व दोन - वि. ल. भावे